ePaper

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आज मुंबईत रोड शो!




॥ वर्ष - 7 । अंक - 324 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 15 मे 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



**आतील पानांत**

- निवडणुकीत होऊ दे खर्च..!
- शहरात नवीन वाहनांची पडणार भर!
- तेव्हापासून ही बाई हवेत उडू लागली!
- राजस्थानने प्लेऑफमध्ये मारली धडक!


## प्रफुल्ल पटेल यांनी शिवभक्तांचा अपमान केला

# मोदींच्या जिरेटोपावरून नवा वाद!

### छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केल्याची प्रफल पटेलांवर टीका

**। मुंबई । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।**

**वाराणसी येथून नामांकन दाखल केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना शुभेच्छा देताना राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांनी मोदी यांच्या डोक्यावर चढवलेल्या जिरेटोपावरून नवीन वादाला तोंड फुटले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेशी घट्ट बांधल्या गेलेल्या जिरेटोपाविषयी काही संकेतही दृढ आहेत. असे असताना मोदी यांना जिरेटोप घातल्याबद्दल शिवभक्तांमधून पटेल यांच्याविषयी तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. भाजप आणि शिवसेना शिंदेगटाने याबाबत सारवासारव करताना 'यात मोदींचा दोष नाही' असे म्हटले आहे.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी वाराणसी येथून उमेदवारी अर्ज दाखल केला. याप्रसंगी राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील घटकपक्षांचे प्रमुख नेते तसेच भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित होते. महाराष्ट्रातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि प्रफुल पटेल यांनी कार्यक्रमाला हजेरी लावली. मोदी यांनी अर्ज दाखल केल्यानंतर या नेत्यांनी त्यांना भेटून शुभेच्छा दिल्या. त्यावेळी पटेल यांनी मोदी यांच्या डोक्यावर स्वहस्ते जिरेटोप चढवला. या प्रसंगाची चित्रफित समाजमाध्यमांवरून प्रसारित होताच महाराष्ट्रातून त्यावर संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. 'छत्रपती शिवाजी महाराज यांच्याव्यतिरिक्त अन्य कोणीही जिरेटोप परिधान करू नये, असा संकेत आहे. पंतप्रधान मोदी हे छत्रपती नाहीत. केवळ छत्रपती हा जिरेटोप परिधान करू शकतात. जिरेटोपाचा अवमान करण्यात येऊ नये,' असा इशारा संभाजी ब्रिगेडचे संतोष शिंदे यांनी दिला. मोदी यांची मर्जी संपादन करण्यासाठी राज्यातील नेते किती लाचार होत आहेत, हे यावरून दिसून येते, अशी टीकाही त्यांनी केली. दूरचित्रवाणीवर शिवाजी महाराजांची भूमिका साकारणारे राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनीही याबद्दल नाराजी व्यक्त करताना 'आपण काय करत आहोत, हे प्रत्येकाला कळायला हवे' अशी प्रतिक्रिया दिली. शिवसेना शिंदे गट आणि भाजपच्या नेत्यांनी याविषयी सारवासारव केली आहे. 'जिरेटोपावरून राजकारण करू नये, ज्यांनी जिरेटोप घातला त्या पंतप्रधानांचा यात काय दोष? अशा प्रकारची पुनरावृत्ती होणार नाही,' असे स्पष्टीकरण उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले तर,'प्रफुल पटेल यांनी पंतप्रधान मोदी यांना जिरेटोप घातला त्यात मोदी यांचा काय दोष?' असा सवाल भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला.

> “ छत्रपती शिवाजी महाराज हे आपले दैवत आहेत पण या दैवताचा सातत्याने अपमान केला जात आहे. तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, भापजाचा प्रवक्ता सुधांशु त्रिवेदी, मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्यासह अनेकांनी महाराजांचा अपमान केला पण भारतीय जनता पक्षाने त्यावर चकार शब्द काढला नाही. अयोध्यातील राम मंदिर उद्घाटन सोहळ्यातही श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष गोविंदगिरी महाराजांनी नरेंद्र मोदी यांची तुलना छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी केली होती. असे प्रकार शिवाजी महाराजांचा अपमान करणारे आहेत, त्याला आळा घातला पाहिजे पण त्यात भरच पडत आहे.
>
> **- नाना पटोले,** महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष

> “ छत्रपती शिवाजी महाराज्यांव्यतिरिक्त कोणीही जिरेटोप परिधान करू शकत नाही. इतर सर्व मावळे किंवा सरदार हे पगड्या, फेटे घालत होते. हा अधिकार केवळ छत्रपतींचा होता. इतर कोणीही हा अधिकार घेण्यास पुढे धजावलेला नाही. असा ऐतिहासिक संदर्भ आहे. शिंदे, होळकर यांच्या सारख्या बलाढ्य सरदारांनीही कधी जिरेटोप घातलेला नाही. मोदी यांची मर्जी मिळविण्यासाठी उत्साहाच्या भरात कोणी काहीही करीत आहे. उद्या राज्यभिषेक करून मोकळे होतील.
>
> **– जयसिंगराव पवार,** लेखक, इतिहास अभ्यासक, कोल्हापूर

## वाराणसीमधून नरेंद्र मोदी निवडणूक रिंगणात

### स्वतःचे ना घर; ना गाडी : आणि जवळ रोकड फक्त 52 हजार रुपये !

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज भव्य रॅली काढून वाराणसी मधून लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज भरला. गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ तसेच भाजपाचे अनेक ज्येष्ठ नेते यावेळी उपस्थित होते.**



या अर्जासोबत नरेंद्र मोदी यांनी आपल्या संपत्तीबाबत जे प्रतिज्ञापत्र जोडले आहे, त्यामधील उल्लेख पाहून सर्वसामान्य नागरिक मात्र अचंबित झाला आहे. स्वतःच्या मालकीचे एकही घर नाही, स्वतःच्या मालकीची मोटार नाही, आणि जवळ असलेली रोख रक्कम केवळ ५२ हजार रुपये असल्याचे प्रतिज्ञापत्रात स्पष्ट नमूद करण्यात आले आहे. त्यांची एकूण 'मुव्हेबल' मालमत्ता ही तीन कोटी दोन हजार रुपये असल्याचा उल्लेख प्रतिज्ञापत्रात आहे.

निवडणुकीच्या अनुषंगाने अनेक राजकीय नेते आपली प्रतिज्ञापत्रे सादर करत असतात. उत्पन्नाचे साधन नाही, पण, मालमत्ता मात्र २०० कोटीची असे आकडे देखील काही जण मांडत असतात. काही जणांच्या कडे शंभर एकर जमीन दिसत असून प्रतिज्ञापत्रात मात्र साडेतीन ते चार एकर जमीन दाखवली जाते हे संपूर्ण जनतेला माहीत असते. पण, गेल्या दहा वर्षात पंतप्रधान पदावर असूनही नरेंद्र मोदी यांची ही मालमत्ता, त्यांचा प्रामाणिकपणा, आणि भ्रष्टाचाराचा एकही शिंतोडा उडाला नसल्याचे म्हणजेच प्रामाणिकपणाचे ते द्योतक आहे.

### मुहूर्त 'तो' आणि 'हा'!

» नरेंद्र मोदी प्रत्येक गोष्टीत मुहूर्त पाहात असतात, हे सर्वश्रुत आहेच. त्यांनी आज (मंगळवारी) वाराणसी लोकसभा मतदारसंघातून अर्ज भरताना ज्येष्ठ वैदिक गणिताचे अभ्यासक गणक भास्कर श्री. गणेश्वर शास्त्री हे त्यांच्या उमेदवारीचे प्रस्तावक आहेत. ते देखील यावेळी उपस्थित होते. श्री गणेश्वर शास्त्री यांनी श्री राम जन्मभूमीवर यावर्षी दि. २२ जानेवारी रोजी झालेल्या श्री रामलल्लाच्या प्रतिष्ठापनेचा मुहूर्त काढला होता, हे विशेष!

# निवडणुकीत होऊ दे खर्च..!

## कोणाचा खर्च सर्वाधिक, तर कोणाचा हात आखडता?

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे, शिरूर लोकसभा मतदार संघांसाठी सोमवारी (१३ मे) मतदान पार पडले. या निवडणुकीसाठी सर्वाधिक ७४ लाख ९७ हजार रुपये प्रचार खर्च हा शिरूरचे महायुतीचे उमेदवार शिवाजी आढळराव पाटील यांनी केला आहे. त्याखालोखाल पुण्याचे महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी ६९ लाख ४१ हजार रुपये खर्च केला आहे. शिरूरचे महाआघाडीचे उमेदवार अमोल कोल्हे यांनी ५३ लाख ६९ हजार, तर पुण्याचे महाआघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी ४६ लाख ४३ हजार रुपये प्रचारावर खर्च केला आहे. या चारही उमेदवारांच्या प्रचार खर्चात तफावत येत असल्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून तिसरी नोटीस बजावण्यात आली आहे.**




पुणे, शिरूर मतदार संघांतील उमेदवारांच्या दैनंदिन खर्चाची तीन वेळा तपासणी करण्यात आली. पहिली तपासणी ३ मे, दुसरी ७ मे, तर तिसरी तपासणी ११ मे रोजी करण्यात आली. या तिन्ही तपासणीत शिरूरमधील आढळराव, कोल्हे आणि पुण्याचे मोहोळ, धंगेकर यांच्या प्रचार खर्चात तफावत आढळली होती. त्यामुळे शिरूरचे निवडणूक निर्णय अधिकारी अजय मोरे आणि पुण्याचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी नोटीस बजावली होती. त्यानंतर या उमेदवारांच्या प्रतिनिधींनी काही खर्च मान्य केला, तर काही खर्च अमान्य केला होता. शेवटच्या खर्च तपासणीत देखील या चौघांच्या निवडणूक प्रतिनिधींनी सादर केलेला खर्च आणि प्रशासनाच्या शॅडो रजिस्टरमधील खर्चात तफावत आली आहे. दरम्यान, प्रचार खर्चातील तफावतीबाबत आढळराव, कोल्हे, मोहोळ आणि धंगेकर यांना नोटीस बजावण्यात आली असून, त्यावर खुलासा करावा लागणार आहे. खुलासा न केल्यास हा खर्च मान्य असल्याचे समजून संबंधित उमेदवाराच्या खर्चात समाविष्ट केला जाणार आहे. तसेच ४ जून रोजी निवडणुकीचा निकाल लागणार आहे. त्यानंतर ३० दिवसांत पुणे, शिरूर लोकसभा मतदार संघांच्या खर्च निरीक्षकांसमवेत उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी हजर राहून खर्चातील तफावत दूर करण्यात येणार आहे.

### पुण्यात वाढलेला मतटक्का कोणत्या 'लाटे'चा परिणाम?

पुण्यात या वेळी गेल्या लोकसभा निवडणुकीपेक्षा ३.७ टक्के अधिक मतदान झाले असून, सहाही विधानसभा मतदारसंघांत ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त मतदान झाले आहे. हा परिणाम नेमका कोणत्या लाटेचा आहे, असा प्रश्न उपस्थित होण्यास सुरुवात झाली आहे. कसबा, पुणे कँटोन्मेंट, कोथरूड आणि पर्वती या प्रमुख विधानसभा मतदारसंघातील मतदानाची टक्केवारी वाढली आहे. 'कसबा' हा भाजपचा पारंपरिक मतदारसंघ समजला जात होता. मात्र, वर्षभरापूर्वी झालेल्या पोटनिवडणुकीत रवींद्र धंगेकर यांनी तो काँग्रेसकडे खेचून आणला. या निवडणुकीत कसबा मतदारसंघातून तब्बल ५९.२४ टक्के मतदान झाले आहे. या परिस्थितीत भाजपला गेल्या निवडणुकीसारखी आघाडी मिळणार, की धंगेकरांनी पोटनिवडणुकीत दाखवलेला चमत्कार पुन्हा दिसणार, अशी चर्चा आहे.

### उमेदवारांच्या खर्चाचा आढावा

| उमेदवार- | शॅडो रजिस्टरनुसार | उमेदवारांनुसार | तफावत |
|---|---|---|---|
| **शिवाजी आढळराव** | ७४,९७,०८६- | ३२,६३,९०९ | ४२,३३,१७७ |
| **अमोल कोल्हे** | ५३,६९,९२५ | ३६,३८,४९१ | १७,३१,४३४ |
| **मुरलीधर मोहोळ** | ६९,४१,७१६ | १९,५०,३२७ | ४९,९१,३८९ |
| **रवींद्र धंगेकर** | ४६,४३,५३३ | ३२,५६,२५३ | १३,८७,२८० |

### मावळमध्ये घटलेल्या मताचा कोणाला फटका?

पुणे आणि रायगड जिल्ह्यात विभागलेल्या मावळ लोकसभा मतदारसंघात यंदा दोन्ही शिवसेनेत चुरशीची लढत झाली. पण, मतदानात चुरस दिसून आली नाही. मागीलवेळीपेक्षा पाच टक्क्यांनी मतदानात घट झाली आहे. घटलेल्या मताचा कोणाला फटका बसणार याचे आखाडे बांधण्यास सुरुवात झाली आहे. मावळमध्ये ५५.८७ टक्के मतदान झाले असून घाटाखालील उरण, कर्जत विधानसभा मतदारसंघात, सर्वाधिक तर पनवेलमध्ये सर्वात कमी मतदान झाले. महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांच्यासह ३३ उमेदवार निवडून रिंगणात आहेत. मात्र, खरी लढत बारणे आणि वाघेरे यांच्यातच झाली. मावळमध्ये पनवेल, कर्जत, उरण, मावळ, चिंचवड आणि पिंपरी विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे. २५ लाख ८५ हजार १८ मतदारांपैकी केवळ १४ लाख १८ हजार ४३९ मतदारांनीच मतदानाचा हक्क बजाविला. त्यात सात लाख ७७ हजार ७४२ पुरुष तर सहा लाख ४० हजार ६५१ महिला आणि इतर ४६ जणांनी मतदान केले.

---

# भीमा-कोरेगाव हिंसाचार: सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय!

## पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते गौतम नवलखा यांना जामीन मंजूर

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**२०१८ च्या भीमा कोरेगाव हिंसाचार प्रकरणातील आरोपी गौतम नवलखा यांना सर्वोच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. न्यायालयाने (आज १४ मे) रोजी नवलखा यांना जामीन मंजूर केला. पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते गौतम नवलखा यांचे वय आणि या खटल्याची सुरू असलेली सुनावणी लवकर पूर्ण होत नसल्याने सर्वोच्च न्यायालयाने नवलखा यांना जामीन देण्याचा निर्णय घेतला.**



### अन्य आरोपींनाही जामीन मंजूर

या प्रकरणातील अन्य आरोपींनाही जामीन मंजूर करण्यात आल्याचे न्यायालयाने सांगितले. नवलखा चार वर्षांहून अधिक काळ तुरुंगात असून या प्रकरणात अद्याप आरोप निश्चित करण्यात आलेले नाहीत. अशा स्थितीत खटल्यातील बराच वेळ लक्षात घेऊन न्यायालयाने नवलखा यांना जामीन मंजूर केला.

### नवलखा यांच्या सुरक्षेचा खर्च २० लाख रु

गौतम नवलखा यांच्या जामिनावर मुंबई उच्च न्यायालयाने घातलेली स्थगिती वाढवण्यास न्यायमूर्ती एम.एम. सुंदरेश आणि एस.व्ही.एन भाटी यांच्या खंडपीठाने नकार दिला. नवलखा यांना नजरकैदे दरम्यान सुरक्षेचा खर्च म्हणून २० लाख रुपये देण्याचेही निर्देश दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर, गौतम नवलखा यांना त्यांचे वाढलेले वय आणि आरोग्य स्थिती लक्षात घेऊन नोव्हेंबर २०२२ पासून नजरकैदेत ठेवण्यात आले आहे.

### चर्चा केल्याशिवाय आम्ही स्थगिती वाढवणार नाही

"जामीन देण्याचा उच्च न्यायालयाचा आदेश तपशीलवार असल्याने स्थगिती आणखी वाढवू नये, असा आमचा कल आहे. नवलखांनी चार वर्षांहून अधिक काळ तुरुंगवास भोगला आहे. आणि खटला पूर्ण होण्यासाठी अनेक वर्षे लागतील. वादांवर तपशीलवार चर्चा केल्याशिवाय आम्ही स्थगिती वाढवणार नाही", असे न्यायालयाने जामीन देताना म्हटले.

### जातीय दंगली भडकवल्याच्या आरोपावरून अटक

नवलखा आणि इतरांना १ जानेवारी २०१८ रोजी महाराष्ट्रातील पुण्याजवळील भीमा कोरेगाव स्मारकात जातीय दंगली भडकवल्याच्या आरोपावरून अटक करण्यात आली होती. या प्रकरणावरुन न्यायमूर्ती ए.एस.गडकरी आणि शिवकुमार डिगे यांच्या खंडपीठाने गेल्या डिसेंबरमध्ये नवलखा यांना जामीन मंजूर केला होता. त्यावेळेस UAPA च्या कलम १५ अंतर्गत दहशतवादी कृत्य केले आहे, असे अनुमान काढण्यासाठी कोणतेही पुरावे नाही,असे कोटीने म्हटले होते. मात्र, एनआयए ने सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यासाठी वेळ मागितल्यानंतर उच्च न्यायालयाने आपल्या आदेशाला ३ आठवड्यांसाठी स्थगिती दिली होती.

# शहरात नवीन वाहनांची पडणार भर!

## अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर नागरिकांनी वाहन खरेदीला पसंती दिली

।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर नागरिकांनी वाहन खरेदीला पसंती दिली आहे. पिंपरी-चिंचवड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे यावर्षी नव्याने ५ हजार २२८ वाहनांची नोंद झाली आहे. यामध्ये १ हजार ५२१ चारचाकी आणि तीन हजार ८३ दुचाकी वाहनांचा समावेश आहे.**




अक्षय्य तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर घर, सोने, वाहन आणि इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांची खरेदी करण्याकडे नागरिकांचा कल असतो. पिंपरी-चिंचवड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांतर्गत देखील यंदा वाहनांची मोठी नोंद झाली आहे. यंदा १ ते १० मे दरम्यान सुमारे ५ हजार २२८ वाहनांची नोंद करण्यात आली आहे. यामध्ये २ हजार ७५७ दुचाकी, तर १ हजार २३२ चारचाकी वाहनांची नोंदणी झाली आहे. तीनचाकी प्रवासी रिक्षाच्या खरेदीलादेखील यंदा अनेकांनी प्राधान्य दिले. यावर्षी ११९ प्रवासी रिक्षांची नोंद झाली आहे. याबरोबरच दोन रुग्णवाहिका, ३७ बसेसचीदेखील नोंदणी करण्यात आली असल्याची माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अतुल आदे यांनी दिली.

### चार्जिंग स्टेशनचा अभाव

पिंपरी-चिंचवड शहरात दिवसेंदिवस इलेक्ट्रिक वाहनांच्या खरेदीला नागरिकांची पसंती मिळत आहे. त्या प्रमाणात चार्जिंग स्टेशन उभारणे गरजेचे आहे. मात्र, चार्जिंग स्टेशन नसल्याने इलेक्ट्रिक वाहनधारकांची गैरसोय होत आहे. तसेच शासनाने इलेक्ट्रिक वाहनांवरील अनुदान बंद केल्यामुळे ई-वाहनांच्या किमती वाढल्या आहेत.

### नोंदणी झालेल्या वाहनांची संख्या

- मोटार सायकल/ स्कूटर - ३०८३
- मोटार कार - १५२१
- गुड्स कॅरिअर - २०९
- मोटार कॅब - १४८
- तीनचाकी प्रवासी रिक्षा - ११९
- उर्वरित - १४८

# चॅलेंजर पब्लिक स्कूलचा निकाल १०० टक्के!

## बारावीमधे शिवम काकडे तर दहावीमध्ये सुजल भूते प्रथम...



।पिंपरी।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (सीबीएसई) झालेल्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांचा निकाल सोमवारी (दि. १३) रोजी जाहीर करण्यात आला. यात पिंपळे सौदागर येथील चॅलेंजर पब्लिक स्कूल या शाळेचा इयत्ता दहावी आणि बारावीचा निकाल १०० टक्के लागला आहे. चॅलेंजर पब्लिक स्कूलचे सर्व विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत.**

इयत्ता बारावीमधे शिवम काकडे हा विद्यार्थी ९१ टक्के गुण प्राप्त करुन बारावी सायन्स विभागात पहिला आला आहे. इयत्ता दहावीत देखील तो प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला होता. इयत्ता दहावीमध्ये सुजल गणेश भूते हा ९८.६ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला आहे. विशेष बाब म्हणजे सूजलने गणित आणि संस्कृत या दोन्ही विषयात पैकीच्या पैकी १०० गुण प्राप्त केले आहेत. दहावीच्या परीक्षेत मनस्वी पंकज मिश्रा हिने द्वितीय आणि जिजाऊ जगताप हिने तृतीय स्थान प्राप्त केले आहे. मनस्वीने गणित विषयात १०० गुण मिळविले आहेत.

शाळेचे संस्थापक, अध्यक्ष संदीप काटे यांनी सर्व विद्यार्थ्यांच्या दैदिप्यमान कामगिरीचे कौतुक केले आहे. या यशामधे शाळेच्या सर्व शिक्षिका, प्रिन्सिपल मॅडम यांचा मोलाचा वाटा आहे, हे त्यांनी आवर्जन नमूद केले. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांच्या उत्ज्वल भविष्यासाठी संदीप काटे यांनी भरभऊन शुभेच्छा दिल्या आहेत.


# आकुर्डी परिसरात तब्बल दहा तास वीज गायब

## भूमिगत केबलमधील तांत्रिक बिघाडामुळे समस्या उद्‌भवली

।पिंपरी।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आकुर्डी परिसरात मंगळवारी (ता. १४) तब्बल दहा तास वीजपुरवठा खंडित झाला. भूमिगत केबलमधील तांत्रिक बिघाडामुळे ही समस्या उद्‌भवली असल्याचे 'महावितरण'ने म्हटले आहे. महिन्याभरात ही दुसऱ्यांदा समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे परिसरातील व्यापाऱ्यांचे नुकसान होत असून स्थानिक नागरिकही त्रस्त झाले आहेत.**





आकुर्डीतील म्हाळसाकांत चौकाजवळील भालेराव हॉस्पिटल परिसरात महावितरणच्या वतीने भूमिगत केबलच्या देखभाल-दुरूस्तीची कामे सुरू आहेत. ही कामे सुरू असताना सातत्याने काही तांत्रिक बिघाडामुळे या परिसरात वीज पुरवठा खंडित होत आहे. या महिन्यात दोन वेळा अशा घटना घडल्या.

मंगळवारी (ता. १४) देखील नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागला. भूमिगत केबलमधील तांत्रिक बिघाडामुळे सकाळी आठ वाजता वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर सायंकाळी सहा वाजता तो सुरळीत झाला. दहा तास ही समस्या निर्माण झाल्याने या परिसरातील व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाले. सातत्याने या परिसरात समस्या निर्माण होत आहेत. याबाबत स्थानिक नागरिकांनी महावितरण कार्यालयाकडे तक्रारी केल्या.

### मागणी वाढल्याने विद्युत तारांवर जादा भार

उन्हाळ्यात वीजेचा अधिक वापर वाढला आहे. त्यामुळे विद्युत तारांवर जादा भार येत आहे. त्यामुळे, या अडचणी निर्माण होत असल्याचे 'महावितरण'कडून सांगण्यात येत आहे. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी परिसरातील नागरिकांमधून होत आहे.

> आमच्या भागात सातत्याने वीज पुरवठा खंडित होत आहे. आम्ही वारंवार त्याबाबत तक्रारी करत आहे. मात्र, त्याकडे कोणीही लक्ष देत नाही. विद्युत तारांची क्षमता वाढविणे गरजेचे आहे. जुन्या केबल बदलून नवीन बसवाव्यात. योग्य वेळेत देखभाल दुरूस्ती करणे गरजेचे आहे.
>
> **-सुभाष राणे,** सामाजिक कार्यकर्ते

> आकुर्डीत वीज पुरवठा खंडित झालेला नाही. तसेच वीज पुरवठा खंडित झाला असल्याबाबत आमच्याकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
>
> **-अशोक जाधव,** अतिरिक्त कार्यकारी अभियंता, आकुर्डी

# नेत्यांच्या निवृत्तीचे वय निश्चित करायला हवे!




## कारण राजकारण

**तरुणांनी राजकारणात यावे असे आवाहन विविध नेतेमंडळींकडून सातत्याने केले जाते. या संदर्भात स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायतीत परिवर्तन होताना दिसत असले तरी मुख्य प्रवाहात मात्र प्रस्थापित नेतेच महत्वांच्या पदावर विराजमान असतात, ही सध्याची स्थिती आहे.**

वयोवृद्ध झाल्यावरही खुर्चीला चिकटून राहण्याच्या नेत्यांच्या मनोवृत्तीबाबत युवावर्गात खदखदही आहे. ७५ वर्षांपुढील व्यक्तीला राजकीय पद द्यायचे नाही, असा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ साली घेतला होता आणि २०२५ मध्ये पंतप्रधान मोदी हे ७५ वर्षे पूर्ण करीत असल्याने ते निवृत्त होऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पंतप्रधान करतील, असा दावा दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी हंगामी जामीनावर बाहेर पडल्यानंतर केल्याने देशात खळबळ उडाली आहे. त्यावर लागलीच भाजपच्या घटनेत असे काही म्हटलेले नाही.

निवडणूक जिंकून नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा भाजपकडून पंतप्रधान होतील, असे स्पष्ट करत अमित शाह यांनी केजरीवाल यांचा दावा फेटाळून लावला आहे. असे असले तरी याबाबत देशभर तीव्र संमिश्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. राजकारण्यांच्या निवृत्तीबाबत खुद्द राजकारणातही वेगवेगळे मतप्रवाह आहेत. मागील लोकसभा निवडणुकीच्या वेळी राहुल गांधी यांनी राजकारणात निवृत्ती असावी आणि साठ वर्षे हे राजकीय नेत्यांच्या निवृत्तीचे वय असावे, असे नमूद केले होते. भारतातील बहुतांश राजकारण्यांसाठी वय हा केवळ एक आकडा आहे. परिस्थिती अतिशयच प्रतिकूल झाल्याशिवाय ते राजकारण सोडत नाहीत. अजित पवार यांनी शरद पवार यांच्या वयावर ते ८३ वर्षांचे आहेत, अशी खोचक टिप्पणी केली होती. लालकृष्ण आडवाणी आणि मुरली मनोहर जोशी यांची उदाहरणे देत हे सुचवण्यात आले होते. याचाच अर्थ राजकारण्यांनाही याबाबत टोचणी लागलेली आहेच. सरकारने नोकरशहांच्या निवृत्तीचे वय निश्चित केले आहे तर राजकारण्यांसाठी सेवानिवृत्तीचे वय का नाही, असा आक्रमक सवाल सर्वसामान्यांकडून उपस्थित केल जातो. त्यामुळेच नवभारताच्या निर्माणासाठी योग्य निर्णय घेण्याची वेळ आलेली आहे.



तरुणांना जास्तीतजास्त संधी देऊन वरिष्ठांनी त्यांच्यासाठी जागा रिक्त केल्या पाहिजेत आणि सल्लागार व मार्गदर्शकाची भूमिका पार पाडली पाहिजे. प्रत्येक व्यवसाय आणि नोकरीत निवृत्तीचे वय निश्चित असले तरी राजकारण हे एकमेव असे क्षेत्र आहे की जिथे निवृत्तीच्या वयाची कोणतीही सीमा नाही. किंबहुना वाढते वय हिच तिथे मोठी पात्रता आहे. भारतीय राजकारण पाहता तरी हेच म्हणावेसे वाटते.

२०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार जगात भारत हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो. राजकारणीच आपल्या भाषणात हे आवर्जुन सांगतात. सरकारनेसुद्धा धोरणे आखताना युवा भारत डोळ्यासमोर ठेवूनच प्राधान्यक्रम निश्चित केला पाहिजे. केंद्र आणि राज्य मंत्रिमंडळात मंत्र्यांचे सरासरी वय ५५ पेक्षा कधीच कमी नसते. जगातील प्रगत लोकशाही राष्ट्रांमध्ये अनेक महत्त्वाच्या राजकीय व प्रशासकीय पदांसाठी वयाची अट निश्चित केली आहे. राजकारणी व्यक्तीचे निवृत्तीचे वय ६५ किंवा ७० वर्षे असले पाहिजे, जेणेकरून तरुण राजकारणी त्यांच्या जागा घेऊ शकतील. तरुण हे नेहमीच कोणत्याही प्रश्नाकडे पाहताना नव्या दृष्टीने विचार करतात. प्रश्न सोडवताना नवनवीन कल्पनांना प्राथमिकता देतात; जेणेकरून नवीन संकल्पना, तंत्रज्ञान आणि दृष्टी मिळेल. खरे तर राजकारणी माणसांचे अनुभव आणि ज्ञान पुढच्या पिढीसाठी मार्गदर्शक ठरू शकते. राजकारणी व्यक्ती जनतेसाठी जे कायदे बनवतात तेच कायदे त्यांनासुद्धा लागू व्हायला नकोत का ?

देशातील महत्त्वांच्या पदांवर मोठ्या प्रमाणात वयोवृद्ध राजकारणी ठाण मांडून बसले आहेत, अशी भावना तरुणांमध्ये आहे. देशातील वास्तव काय आहे हे जाणून न घेणारे वृद्ध नेतेच प्रगतीतील खरा अडथळा आहे, असा तरुणवर्गाचा समज होत आहे, ही चिंतेची बाब आहे.

## संपादकीय »

### तोफ मागोगे तो, बंदूक तो मिलेगी!

***एकदा साहेबांनी डायस वरून एक त्यांच्या गावातील वकिलांचा किस्सा सांगितला होता त्या वकील साहेबांना बंदुकीचे लायसेन्स होते त्यांनी कलेक्टरकडे अर्ज करताना तोफेचे लायसेन्स मागितले त्यावर कलेक्टर म्हणाले मला चुकीचे लायसेन्स देता येत नाही मला फक्त बंदुकीचे लायसेन्स द्यायचा अधिकार आहे.***

त्यावर ते वकील म्हणाले नागरिक जी मागणी करतात त्याच्या एक चतुर्थांश मागणी तुम्ही मान्य करता त्यामुळे मी बंदुकीचे लायसेन्स मागितले तर आपण केवळ बंदुकीच्या नळीचे लायसेन्स द्याल म्हणून मी तोफेचे लायसेन्स मागितले म्हणजे किमान माझ्या पदरात बंदुकीच्या लायसेन्स पडेल! देशात निवडणुका जाहीर होण्यापूर्वी पंतप्रधान मोदींनी लोकसभेमध्ये आपकी बार ४०० पारअशी घोषणा केली यापैकी कोणीही मोदीना बहुमत मिळणार नाही अगर 272 च्या पेक्षा मोदींच्या जागा कमी होतील असे म्हणायचे बंद केले याउलट चारशे कुठल्या येतात 350 तरी येऊ देत असे दर्पोक्तिपूर्ण उद्गार, काढण्यास सुरुवात केली.

उबाठा गटाच्या राज्यसभेतील खासदार प्रियांका चतुर्वेदी याच मुळात गद्दार आहेत.कारण त्यांनी यापूर्वी कॉंग्रेसची गद्दारी करत त्यावेळच्या उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेत बोलबच्चन खासदार संजय राऊत यांच्या करवी शिवसेनेत कोणत्या तडजोडी करत राज्यसभेचे खासदारपद भूषविले, याची संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे.

# धूर्त प्रियांका चतुर्वेदींचं डोळे मिटून दूध पिणं !

आपण करू ते पुण्य अन् दुसरा करेल ते पाप कारण जे आपण पुण्य करतो ते अंधारातलं असतं अन् दुसरा पाप करेल ते उजेडातलं! पण, मांजराने कितीही डोळे झाकून दूध पिलं तरी ते मांजर समोरच्या बघणाऱ्या व्यक्तीचे डोळे बंद करत नाही, कारण त्या मांजराची तेवढी औकात नसते. आपण आपल्या खासदार संजय राऊत यांच्या मेहरबानीची जरूर जाणीव ठेवावी पण राऊत जसे रोज सकाळी भोंगा पसरतात तसा भोंगा काय साधी पिपाणी सुध्दा वाजवायला जाऊ नका. नाहीतर मराठी बाणा दाखवायला शीतलताई म्हात्रे नावाच्या रणरागिणी कधी सुध्दा अंगावर येतील, मग तुम्हाला पळताना नाकीनऊ येईल.

खासदार प्रियांका चतुर्वेदी या स्वतःला पहिल्यापासून फारच शहाण्या समजतात, म्हणून तर त्यांना कॉंग्रेस पक्षाने घरचा रस्ता दाखवला हे सर्वमान्य आहे कारण 'अति शहाणा त्याचा बैल रिकामा असतो' पण, ना यांच्याकडे बैल ना वासरू! त्यामुळे त्या आपले तारणहारसंजय राऊत



यांच्याशी बरोबरी करून कधी कधी स्वतःच्या अकलेचे तारे तोडून आपले धिंडवडे काढून 'सुसर तुझी पाठ किती मऊ' म्हणून आपलीच पाठ मोकळी करत असतात. त्यांनी दोन दिवसांपूर्वी मुंबईत कुठेतरी आपल्या अकलेचे तारे तोडताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुत्रावर अर्थात डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यावर 'तुझा बाप गद्दार आहे' आणि तसा शिक्का डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या कपाळावर मारला असल्याचा जादुगिरी भाषेत उल्लेख केला.

यात किती तथ्य आहे, हे प्रियांका चतुर्वेदी यांनी कधी तरी स्पष्ट करायला हवे. कारण स्वपक्षाला तिलांजली देऊन दुसऱ्या पक्षात जातो, तो जर चतुर्वेदी यांना गद्दार वाटत असेल तर याच चतुर्वेदी यांनी पाच वर्षांपूर्वी एकनिष्ठतेचे कोणते दिवे लावले म्हणून त्यांची या पक्षातून हकालपट्टी झाली किंवा त्यांनी राऊतांची सलगी साधत कॉंग्रेसला सोडचिठ्ठी दिली त्यांनी कॉंग्रेस पक्षात आपल्याला कवडीचीही किंमत नाही हे ओळखून संजय राऊत यांची कशी मनधरणी करून राज्यसभेची खासदारकी पदरात पाडून घेतली, हे संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे अन् तसे नसेल तर शिवसेनेच्या माजी नगरसेविका शीतल म्हात्रे काय किंवा आमदार संजय शिरसाट काय यांनी परवाच या चतुर्वेदींचा जो समाचार घेतला आहे तो त्यांनी जरूर वाचावा, तोंडाला कायमचे कुलुप लावावे. कारण यापुढे विश्व प्रवक्ते खासदार संजय राऊत यांना खासदारकी मिळणार नाही त्यामुळे तुमची तर खासदारकी ही फार दूरची गोष्ट आहे त्यामुळे उरलीसुरली चारसहा महिन्यातील खासदारकी व्यवस्थित उपभोगा कारण राऊतांसह तुमचेही संसदेतील शेवटचे दिवस आहेत. हे कदापि विसरू नका!

## ।। अभंगवाणी ।।



कर कटावरी तुळसीच्या माळा ।
ऐसें रूप डोळां दावीं हरी ॥१॥
ठेविले चरण दोन्ही विटेवरी ।
ऐसें रूप हरी दावीं डोळां ॥ध्रु.॥
कटीं पीतांबर कास मिरवली ।
दाखवीं वहिली ऐसी मूर्ती ॥२॥
गरुडपारावरी उभा राहिलासी ।
आठवें मानसीं तें चि रूप ॥३॥
झुरोनी पांजरा होऊं पाहें आतां ।
येईं पंढरीनाथा भेटावया ॥४॥
तुका म्हणे माझी पुरवावी आस ।
विनंती उदास करूं नये ॥५॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे '**महाईन्यूज**'च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# तेव्हापासून ही बाई हवेत उडू लागली!

## सुषमा अंधारेंच्या राज ठाकरेंवरील टीकेनंतर मनसेचा हल्लाबोल

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी दोन दिवसांपूर्वी ठाण्याचे महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांच्या प्रचारासाठी सभा घेतली. या सभेत त्यांनी शिवसेनेच्या ठाकरे गटावर सडकून टीका केली. त्याचबरोबर ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनाही टोला लगावला. राज यांनी सुषमा अंधारेंचा जुना व्हिडीओ दाखवून ‘लाव रे तो व्हिडीओ’ची झलक दाखवली.**





त्यापाठोपाठ सुषमा अंधारे यांनी राज ठाकरेंच्या टीकेला प्रत्युत्तर दिलं. अंधारे यांनी आधी समाजमाध्यमांवर पोस्ट करून आणि त्यानंतर जाहीर सभेतून राज ठाकरेंवर टीका केली. अंधारे यांच्या या टीकेनंतर मनसेने त्यांना प्रत्युत्तर दिलं आहे.राज ठाकरेंच्या ठाण्यातील सभेनंतर सुषमा अंधारे यांनी फेसबूकवर एक पोस्ट लिहिली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे, मिस्टर राज, तुमच्यात आणि माझ्यात एक फरक आहे. मी सामाजिक न्यायासाठी लढत आहे. तुम्ही मात्र कायम प्रोएस्टॅब्लिश भूमिका घेत आलात. एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार या सगळ्यांनी मिळून दिलेल्या सुपारीमध्ये तुम्हाला पहिली सुपारी माझ्या नावाची मिळणे हा माझा विजय आहे.सुषमा अंधारे यांच्या या टीकेला आता मनसेच्या सरचिटणीस शालिनी ठाकरे यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. शालिनी ठाकरे म्हणाल्या, राज ठाकरे यांनी सुषमा अंधारे यांचं नाव घेतल्याने त्या आता हवेत उडू लागल्या आहेत. त्यामुळे त्या आता काहीही बोलू शकतात. मुळात त्यांना महाराष्ट्रात कोण ओळखतं? राज ठाकरेंनी त्यांचं नाव घेतल्यामुळे त्या सध्या हवेत उडत आहेत. राज ठाकरेंनी भर सभेत आपलं नाव घेतल्यामुळे त्यांना खूप प्रसन्न वाटतंय, त्यांच्यात खूप उत्साह आला आहे. त्यामुळे त्या आता काहीही बोलू लागल्या आहेत. शालिनी ठाकरे म्हणाल्या, राज ठाकरेंनी सुषमा अंधारे यांचं नाव घेतलं यातच त्यांना मोठा विजय वाटतोय. मुळात त्यांना राज ठाकरे हे काय बोलले हे कळलच नाही. या बाईचा बुद्ध्यांक (IQ) किती कमी आहे हे त्यांच्या वक्तव्यांवरून कळतंय. राज ठाकरे या बाईबद्दल बोलतच नव्हते. ही बाई का म्हणून सगळं स्वतःवर ओढवून घेतेय? राज ठाकरेंनी तिचा उल्लेख करावा इतकी ती मोठी आहे का? ती राज ठाकरेंचं वक्तव्य स्वतःवर ओढवून घेतेय. मुळात राज ठाकरे यांनी तिच्याबद्दल बोलावं इतकी तिची लायकी नाही. ज्या प्रकारे तिने शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यावर टीका केली होती, ती टीका शिवसैनिक आणि आम्ही सर्व हिंदू बांधव कधीच विसरणार नाही. सुषमा अंधारे यांनी राज ठाकरेंच्या टीकेला प्रत्युत्तर दिलं. अंधारे यांनी आधी समाजमाध्यमांवर पोस्ट करून आणि त्यानंतर जाहीर सभेतून राज ठाकरेंवर टीका केली. अंधारे यांच्या या टीकेनंतर मनसेने त्यांना प्रत्युत्तर दिलं आहे. राज ठाकरेंच्या ठाण्यातील सभेनंतर सुषमा अंधारे यांनी फेसबूकवर एक पोस्ट लिहिली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे, मिस्टर राज, तुमच्यात आणि माझ्यात एक फरक आहे. मी सामाजिक न्यायासाठी लढत आहे. तुम्ही मात्र कायम प्रोएस्टॅब्लिश भूमिका घेत आलात. एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार या सगळ्यांनी मिळून दिलेल्या सुपारीमध्ये तुम्हाला पहिली सुपारी माझ्या नावाची मिळणे हा माझा विजय आहे.सुषमा अंधारे यांच्या या टीकेला आता मनसेच्या सरचिटणीस शालिनी ठाकरे यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. शालिनी ठाकरे म्हणाल्या, राज ठाकरे यांनी सुषमा अंधारे यांचं नाव घेतल्याने त्या आता हवेत उडू लागल्या आहेत. त्यामुळे त्या आता काहीही बोलू शकतात. मुळात त्यांना महाराष्ट्रात कोण ओळखतं? राज ठाकरेंनी त्यांचं नाव घेतल्यामुळे त्या सध्या हवेत उडत आहेत. राज ठाकरेंनी भर सभेत आपलं नाव घेतल्यामुळे त्यांना खूप प्रसन्न वाटतं.

### अंधारे यांच्या टीकेनंतर मनसेने प्रत्युत्तर

शालिनी ठाकरे म्हणाल्या, राज ठाकरेंनी सुषमा अंधारे यांचं नाव घेतलं यातच त्यांना मोठा विजय वाटतोय. मुळात त्यांना राज ठाकरे हे काय बोलले हे कळलच नाही. या बाईचा बुद्ध्यांक (IQ) किती कमी आहे हे त्यांच्या वक्तव्यांवरून कळतंय. राज ठाकरे या बाईबद्दल बोलतच नव्हते. ही बाई का म्हणून सगळं स्वतःवर ओढवून घेतेय? राज ठाकरेंनी तिचा उल्लेख करावा इतकी ती मोठी आहे का? ती राज ठाकरेंचं वक्तव्य स्वतःवर ओढवून घेतेय. मुळात राज ठाकरे यांनी तिच्याबद्दल बोलावं इतकी तिची लायकी नाही. ज्या प्रकारे तिने शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यावर टीका केली होती, ती टीका शिवसैनिक आणि आम्ही सर्व हिंदू बांधव कधीच विसरणार नाही. सुषमा अंधारे यांनी राज ठाकरेंच्या टीकेला प्रत्युत्तर दिलं. अंधारे यांनी आधी समाजमाध्यमांवर पोस्ट करून आणि त्यानंतर जाहीर सभेतून राज ठाकरेंवर टीका केली. अंधारे यांच्या या टीकेनंतर मनसेने त्यांना प्रत्युत्तर दिलं आहे.

# ...तोपर्यंत भाजपाबरोबर जाणार नाही!

## महायुतीत जाण्याबाबत आदित्य ठाकरेंचं सूचक विधान!

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महायुतीत जाण्याबाबत ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी सूचक विधान केलं आहे. जोपर्यंत भाजपाकडून लोकशाही संपवण्याचा प्रयत्न सुरू आहे. तोपर्यंत आम्ही भाजपाबरोबर जाऊ शकत नाही, असं ते म्हणाले.**



त्यांच्या या विधानानंतर आता राजकीय वर्तुळात विविध चर्चा रंगू लागल्या आहेत.आदित्य ठाकरे यांनी आज ‘बोल भिडू’ला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी विविध विषयांवर त्यांची भूमिका स्पष्ट केली. यादरम्यान त्यांना पुन्हा भाजपाबरोबर जाणार का? असा प्रश्न विचारण्यात आला. याप्रश्नाचं उत्तर देताना, “भाजपाला या देशातील लोकशाही संपवायची आहे. जोपर्यंत भाजपाकडून लोकशाही संपवण्याचा प्रयत्न सुरू आहे. तोपर्यंत आम्ही भाजपाबरोबर जाऊ शकत नाही”, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.पुढे बोलताना, “अटल बिहारी वाजपेयी आणि लाल कृष्ण आडवाणी यांची भाजपा आणि आताची भाजपा पूर्णपणे वेगळी आहे. आजच्या भाजपाने प्रकाश मेहता, विनोद तावडे, पुनम महाजन अशा कितीतरी नेत्यांना बाजुला काढलं आहे. खरं तर वाजपेयी, आडवाणी, प्रमोद महाजन यांची भाजपा विश्वासार्ह होती. मात्र, आताची भाजपा विश्वासार्ह नाही. त्यांना सत्ता आल्यानंतर मित्रपक्ष नको आहे. आजच्या भाजपाला देशातील संविधान बदलायचे आहे”, अशी टीकाही त्यांनी केली.“२०१४ पूर्वीचं राजकारण वेगळं होतं. आताचं राजकारण वेगळं आहे. आज तुम्ही कोणत्या रंगाचे कपडे घालता, ते काय जेवता यावरून राजकारण केलं जाते. आज शाळेत, महाविद्यालयात आणि खेळातही राजकारण पोहोचलं आहे. घाणेरड्याप्रकारचं राजकारण सुरू आहे. एक काळ होता, ज्यावेळी शरद पवार आणि बाळासाहेब ठाकरे एकमेकांचे राजकीय वैरी होते. दोघांची भूमिका वेगळी होती. मात्र, त्यांचा विरोधात वैयक्तिक कधीच नव्हता”, असेही ते म्हणाले.

### भाजपाबरोबर जाऊ शकत नाही


आदित्य ठाकरे यांनी आज ‘बोल भिडू’ला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी विविध विषयांवर त्यांची भूमिका स्पष्ट केली. यादरम्यान त्यांना पुन्हा भाजपाबरोबर जाणार का? असा प्रश्न विचारण्यात आला. याप्रश्नाचं उत्तर देताना, “भाजपाला या देशातील लोकशाही संपवायची आहे. जोपर्यंत भाजपाकडून लोकशाही संपवण्याचा प्रयत्न सुरू आहे. तोपर्यंत आम्ही भाजपाबरोबर जाऊ शकत नाही”, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

# 'त्या' होर्डिंगची 'लिम्का बुक रिकोर्ड'मध्ये नोंद!

## घाटकोपरच्या दुर्घटनेत 14 मृत्यू, 44 जणांवर उपचार सुरू

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मुंबईत काय सुरु आहे तेच सर्वसामान्यांना कळणं आता कठीण होऊन बसलंय. मुंबईत कोणत्या दिवशी कोणतं संकट कधी येऊन धडकेल याचा काहीच भरोसा आता राहिलेला नाही. इथे रेल्वेच्या ब्रीजवर चेंगराचेंगरी होऊन माणसं मृत्यूमुखी पडतात, लोकल गाड्यांमधून हात सुटून माणसं दगावतात, पावसाळ्यात मॅनहोलमध्ये पडून मृत्यू होतो तर कधी इमारती कोसळतात. घटना अनेक घडतात आणि अनेक जीवांचा बळी जातो. मुंबईत नुकंतच काल झालेल्या घाटकोपरच्या दुर्घटनेत आतापर्यंत 14 जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तर 44 जणांवर सध्या रुग्णालयात उपचार सुरु आहेत. मृतकांचा आकडा वाढण्याची भीती आहे. तसेच बचाव कार्य अद्यापही सुरुच आहे.**



विशेष म्हणजे या घटनेला कारणीभूत ठरलेल्या त्या होर्डिंगची नोंद थेट 'लिम्का बुक रिकोर्ड'मध्ये झालेली होती. किती मोठी शोकांतिका आहे. एकीकडे ते होर्डिंग बेकायदेशीर होतं सांगितलं जात आहे. तर दुसरीकडे मुंबईतलं सर्वात मोठं होर्डिंग म्हणून त्याची नोंद 'लिम्का बुक रिकोर्ड'मध्ये करण्यात आली होती. किती मोठी शोकांतिका आहे. मुंबईत सर्वात मोठ्या होर्डिंगच्या नावाने लिम्का बुक रेकॉर्डमध्ये ज्या होर्डिंगची नोंद होते ते खरंतर बेकायदेशीर असतं. ते अतिशय जीवघेणं आणि कायद्यामध्ये न बसणारं असतं. तरीदेखील उघडपणे असं होर्डिंग उभारलं जातं. मुबईतलं सर्वात मोठं होर्डिंग म्हणून ख्याती कमवतं. तोपर्यंत प्रशासन तोडक कारवाई करण्यासाठी पुढे धजावत नाही. शेवटी पावसाळा जवळ आल्यावर वादळी वाऱ्यामुळे हे होर्डिंग शेजारी असलेल्या पेट्रोल पंपावर कोसळतं आणि सर्व होत्याचं नाहीसं होतं. कित्येकांचा बळी जातो, अनेक जण जखमी होतात. जखमी आणि मृतकांमध्ये अनेक जण हे घराचे कर्तधर्ते असतील. त्यांच्यावर कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत असावा. राज्य सरकारने मृतकांच्या नातेवाईकांना 5 लाखांच्या मदतीची घोषणा दिली आहे. पण हे 5 लाख मृतकांच्या कुटुंबियांना आयुष्यभर पुरणार नाहीत. याशिवाय अतिशय मौल्यवान असलेला त्यांच्या कुटुंबप्रमुखाचा जीव त्यांना परतही मिळणार आहे. त्यामुळे ही खूप मोठी शोकांतिका आहे. विशेष म्हणजे आता कोणी कारवाई केली, कोणी परवानगी दिली याबाबतच्या तांत्रिक गोष्टी आता समोर येत आहेत. पण या तांत्रिक गोष्टींकडे घटनेच्या आधी डोळेझाक का करण्यात आली? किंवा तितक्या वेगाने कारवाई का झाली नाही? असा प्रश्न उपस्थित होतोय.घाटकोपरच्या दुर्घटनेनंतर या प्रकरणात आता नवनवीन माहिती समोर येत आहे. पोलीस प्रशासन, मुंबई महापालिका, रेल्वे विभाग अशा वेगवेगळ्या विभागांकडून या प्रकरणी प्रचंड वेगाने तपास सुरु आहे. पेट्रोल पंपावर कोसळलेलं होर्डिंगचं क्षेत्रफळ हे तब्बल 1583 वर्ग मीटर इतकं होतं.रेल्वे विभाग आणि जाहिरात कंपनी इगो मीडिया या तिघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीआर कार्डच्या अनुसार, ज्या जमिनीवर होर्डिंग लावण्यात आलं होतं ती जमीन कलेक्टर आणि महाराष्ट्र सरकारच्या पोलीस गृहनिर्माण कल्याण महामंडळाच्या ताब्यात आहे. मुंबई रेल्वेच्या पोलीस आयुक्तांकडून एसीपीद्वारे चार होर्डिंगसाठी परवानगी देण्यात आली होती. पण होर्डिंग बनवण्याआधी संबंधित कंपनीकडून रेल्वे विभागाकडून अधिकृतपणे कोणतीही परवानगी किंवा एनओसी घेण्यात आली नव्हती, अशी माहिती आता समोर येत आहे.मुंबईत काय सुरु आहे तेच सर्वसामान्यांना कळणं आता कठीण होऊन बसलंय. मुंबईत कोणत्या दिवशी कोणतं संकट कधी येऊन धडकेल याचा काहीच भरोसा आता राहिलेला नाही. इथे रेल्वेच्या ब्रीजवर चेंगराचेंगरी होऊन माणसं मृत्यूमुखी पडतात, लोकल गाड्यांमधून हात सुटून माणसं दगावतात, पावसाळ्यात मॅनहोलमध्ये पडून मृत्यू होतो तर कधी इमारती कोसळतात. घटना अनेक घडतात आणि अनेक जीवांचा बळी जातो. मुंबईत नुकंतच काल झालेल्या घाटकोपरच्या दुर्घटनेत आतापर्यंत 14 जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तर 44 जणांवर सध्या रुग्णालयात उपचार सुरु आहेत. मृतकांचा आकडा वाढण्याची भीती आहे. तसेच बचाव कार्य अद्यापही सुरुच आहे.

### रेल्वेने एनओसी दिली नव्हती

विशेष म्हणजे या घटनेला कारणीभूत ठरलेल्या त्या होर्डिंगची नोंद थेट 'लिम्का बुक रिकोर्ड'मध्ये झालेली होती. किती मोठी शोकांतिका आहे. एकीकडे ते होर्डिंग बेकायदेशीर होतं सांगितलं जात आहे. तर दुसरीकडे मुंबईतलं सर्वात मोठं होर्डिंग म्हणून त्याची नोंद 'लिम्का बुक रिकोर्ड'मध्ये करण्यात आली होती. किती मोठी शोकांतिका आहे. मुंबईत सर्वात मोठ्या होर्डिंगच्या नावाने लिम्का बुक रेकॉर्डमध्ये ज्या होर्डिंगची नोंद होते ते खरंतर बेकायदेशीर असतं. ते अतिशय जीवघेणं आणि कायद्यामध्ये न बसणारं असतं. तरीदेखील उघडपणे असं होर्डिंग उभारलं जातं. मुबईतलं सर्वात मोठं होर्डिंग म्हणून ख्याती कमवतं. तोपर्यंत प्रशासन तोडक कारवाई करण्यासाठी पुढे धजावत नाही. शेवटी पावसाळा जवळ आल्यावर वादळी वाऱ्यामुळे हे होर्डिंग शेजारी असलेल्या पेट्रोल पंपावर कोसळतं आणि सर्व होत्याचं नाहीसं होतं. कित्येकांचा बळी जातो, अनेक जण जखमी होतात.पण हे 5 लाख मृतकांच्या कुटुंबियांना आयुष्यभर पुरणार नाहीत. याशिवाय अतिशय मौल्यवान असलेला त्यांच्या कुटुंबप्रमुखाचा जीव त्यांना परतही मिळणार आहे. त्यामुळे ही खूप मोठी शोकांतिका आहे.

# भाजपाने स्वीकारले राहुल गांधींचे आव्हान!

## राहुल गांधींबरोबर चर्चा करण्यासाठी एक प्रवक्ता पुरेसा

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्याचे मतदान पार पडले आहे. पुढील टप्प्यांसाठी प्रत्येक पक्ष जोमाने प्रचाराला लागले आहेत. या आठवड्याच्या सुरुवातीला माजी न्यायमूर्ती मदन बी. लोकूर, अजित ए.पी. शहा आणि एन. राम यांनी राहुल गांधी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहित निवडणुकीतील महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चेसाठी आमंत्रित केले होते.**

राहुल गांधी यांनी सार्वजनिक चर्चेच्या पुढाकाराचे कौतुक करत चर्चेत भाग घेण्यास आनंद होईल, असे सांगितले. मी किंवा पक्षाचे प्रमुख मल्लिकार्जुन खरगे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबरोबर सार्वजनिक चर्चा करू इच्छितात, असे मत त्यांनी व्यक्त केले. मात्र, यावर पंतप्रधानांनी प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर भारतीय जनता युवा मोर्चाचे अध्यक्ष तेजस्वी सूर्या यांनी हे आव्हान स्वीकारले आणि संभाव्य चर्चेसाठी युवा विंगचे उपाध्यक्ष अभिनव प्रकाश यांची निवड केली. तेजस्वी सूर्या यांनी आधी मोदींना दिलेल्या आव्हानावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. ते म्हणाले होते की, काँग्रेस नेते पंतप्रधानपदाचे





उमेदवारही नाहीत. मात्र, आता दोन प्रतिस्पर्धी पक्षांमधील सार्वजनिक चर्चेचा प्रस्ताव स्वीकारला आहे. **भाजपा युवा मोर्चाचे उपाध्यक्ष हे गांधी घराण्याच्या पारंपरिक क्षेत्र असलेल्या उत्तर प्रदेशमधील रायबरेली येथील आहेत. "ते केवळ आमच्या युवा शाखेचे एक प्रतिष्ठित नेते नाहीत, तर ते सरकारद्वारे लागू केलेल्या धोरणांचे आणि सुधारणांचे स्पष्ट प्रवक्ते आहेत," असे सूर्या यांनी 'एक्स'वर लिहिले. ३० वर्षीय अभिनव प्रकाश दलित समुदायातील पासी जातीतून येतात. रायबरेलीमध्ये दलित समुदायाची संख्या ३० टक्क्यांहून अधिक आहे. या मतदारसंघातून यंदा राहुल गांधी लोकसभा निवडणूक लढवणार आहेत. अभिनव प्रकाश सध्या दिल्ली विद्यापीठाच्या रामजस कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे सहायक प्राध्यापक आहेत. ते जवाहरलाल विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आहेत. देशातील सर्वात प्रतिष्ठित वाणिज्य महाविद्यालयांपैकी एक असलेल्या श्री राम कॉलेज ऑफ कॉमर्स मध्ये त्यांनी अध्यापन केले आहे.**

### भाजपाने चर्चेचे आमंत्रण नाकारले

चर्चा करण्यासाठी भाजयुमोचा एक प्रवक्ता पुरेसा आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी शुक्रवारी पंतप्रधान मोदींविरुद्ध चर्चेचे आव्हान स्वीकारल्याची घोषणा केली. या चर्चेत पंतप्रधानांनी सहभाग घ्यावा असे सांगून ते म्हणाले की, "मोठ्या पक्षांसाठी एका व्यासपीठावरून देशासमोर त्यांचा दृष्टिकोन मांडणे हा सुदृढ लोकशाहीसाठी एक सकारात्मक उपक्रम असेल." परंतु, भाजपाने चर्चेचे आमंत्रण नाकारले. राहुल गांधी काँग्रेसचे अध्यक्ष नाहीत किंवा ते पंतप्रधान पदाचे उमेदवारही नाहीत आणि म्हणूनच पंतप्रधानांनी त्यांच्याशी चर्चा करण्याचे कोणतेही कारण नसल्याचे भाजपा नेत्यांनी सांगितले.

# आतिफ अस्लमने दाखवली लेकीची पहिली झलक

बॉलिवूड गाण्यांमधून लोकप्रियता मिळवणाऱ्या आतिफ अस्लमचे केवळ भारतातच नव्हे तर जगभरात चाहते आहेत. या सुप्रसिद्ध गायकाला एका वर्षापूर्वी कन्यारत्नाचा लाभ झाला. आतिफची पत्नी साराने २३ मार्च २०२३ला गोंडस बाळाला जन्म दिला आणि सोशल मीडियावरुन आतिफने बाबा झाल्याची गुडन्यूज चाहत्यांना दिली होती. आज (२३ मार्च रोजी) आतिफ त्याच्या गोंडस मुलीचा पहिला वाढदिवस साजरा करत आहे त्यानिमित्ताने आतिफने पहिल्यांदाच त्याच्या मुलीचा हलीमाचा फोटो शेअर केला आहे.आतिफ अस्लमने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक फोटो शेअर केला आहे. बरोबर एका वर्षानंतर आज पहिल्यांदाच त्याने हलीमाचा चेहरा जगासमोर आणला आहे. पहिल्या फोटोत बाबा आतिफ हलीमाबरोबर खेळताना दिसतोय. तर दुसऱ्या फोटोत सफेद फ्रॉकवर हलिमा एकदम गोंडस दिसत आहे. या पोस्टला आतिफने कॅप्शन देत लिहिले, "बाबाने राजकन्येचे शूज खिशात ठेवले आहेत, जेव्हा माझ्या हलीमाला तो हवा असेल तेव्हा ती सांगेल. २३/०३/२०२३- तुला वाढदिवसाच्या खूप साऱ्या शुभेच्छा.

"आतिफच्या लाडक्या लेकीचा फोटो सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या पोस्टवर आतिफच्या अनेक चाहत्यांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. एकाने कमेंट करत लिहिले, "किती सुंदर आहे हलीमा, तुला वाढदिवसाच्या खूप शुभेच्छा". "अल्लाह तुमच्या जीवनात आनंद आणि आशीर्वाद घेऊन येवो. वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा गोंडस हलीमा" असं दुसऱ्याने लिहिलं.दरम्यान, आतिफ अस्लमच्या वैयक्तिक आयुष्याबाबत सांगायचं झालं तर, २०१३मध्ये आतिफने साराशी लाहौरमध्ये निकाह केला होता. त्यांना अब्दुल व अर्यान ही दोन मुले आहेत आणि हलीना त्यांची तिसरी अपत्य आहे. पाकिस्तानी सिंगर असलेल्या आतिफने बॉलिवूडमध्ये नाव कमावलं. त्याची अनेक गाणी लोकप्रिय आहेत.बॉलिवूड गाण्यांमधून लोकप्रियता मिळवणाऱ्या आतिफ अस्लमचे केवळ भारतातच नव्हे तर जगभरात चाहते आहेत. या सुप्रसिद्ध गायकाला एका वर्षापूर्वी कन्यारत्नाचा लाभ झाला. आतिफची पत्नी साराने २३ मार्च २०२३ला गोंडस बाळाला जन्म दिला आणि सोशAल मीडियावरुन आतिफने बाबा झाल्याची गुडन्यूज चाहत्यांना दिली होती.

## गोविंदाने पुन्हा केलं लग्न

सध्या बॉलीवूड अभिनेता गोविंदा खूप चर्चेत आला आहे. एकाबाजूला तो राजकारणात पुन्हा एन्ट्री करणार असल्याची चर्चा आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंबरोबर त्याची भेट झाल्याचं म्हटलं जात आहे. त्यामुळे गोविंद पुन्हा एकदा लोकसभा निवडणुकाच्या रिंगणात उतरणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. अशातच दुसऱ्या बाजूला गोविंदाने ३७ वर्षांनंतर पुन्हा एकदा लग्न केलं आहे. याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होतं आहे. अभिनेता गोविंदा व त्याची पत्नी सुनीता आहुजा 'डान्स दिवाने'च्या चौथ्या पर्वात उपस्थित राहिले होते. याच सेटवर 'कलर्स टीव्ही'च्या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे.या व्हिडीओत, माधुरी दीक्षित म्हणतेय "आमच्याकडे लग्नाचे फोटो देखील नाहीयेत." तर माधुरी म्हणते, "फोटो नाहीत, काही हरकत नाही. 'डान्स दिवाने'चं कुटुंब आहे.

## कंगना अडकणार लग्नबंधनात?



मागील काही महिन्यांत अनेक बॉलीवूड कलाकार आपल्या आयुष्याला नवीन सुरुवात करीत लग्नबंधनात अडकले आहेत. आधी रकुल प्रीत सिंग व जॅकी भगनानी आणि आता क्रिती खरबंदा व पुलकित सम्राट यांनी लग्नगाठ बांधली. आता बॉलीवूडची क्वीन कंगना रणौतही तिच्या नवीन आयुष्याला लवकरच सुरुवात करणार असल्याची माहिती समोर आली आहे. कंगनाने आपल्या लग्नाचे कपडेदेखील निवडले असल्याची चर्चा सुरू आहे. 'रेडिट'वर आलेल्या माहितीनुसार, कंगना आपल्या लग्नातील पोशाख एका ड्रेस डिझायनरकडून तयार करून घेणार आहे. कंगनाचा हा ड्रेस डिझायनर इंडस्ट्रीमधलाच आहे; पण तितकासा सुप्रसिद्ध नाही. कंगनाच्या लग्नाबद्दलच्या गोष्टी खासगी ठेवण्यात आल्या आहेत. कंगना कोणाशी लग्न करणार आहे हे अजून जाहीर झालं नसलं तरी तिचा बॉयफ्रेंड आहे, असं तिनं आधी कबूल केलं होतं.रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात कंगनानं हजेरी लावली होती. त्यादरम्यान, कंगना आणि निशांतचे अयोध्येतील राम मंदिरातील काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते आणि त्यामुळेच कंगना निशांतला डेट करीत असल्याच्या चर्चांना उधाण आलं होतं. पण, अभिनेत्रीनं या अफवा असल्याचं स्पष्ट केलं आणि ती दुसऱ्याच कोणाला तरी डेट करतेय; परंतु तो निशांत नाही, असा खुलासा तिनं केला होता.निशांत पिट्टीबरोबर कंगनाचं अफेअर असल्याचा दावा करणाऱ्या मीडिया रिपोर्टचा स्क्रीनशॉट शेअर करीत कंगनानं तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर लिहिलं, "माझी मीडियाला नम्र विनंती आहे की, कृपया चुकीची माहिती पसरवू नका. निशांतजी विवाहित आहेत आणि मी दुसऱ्या कोणाला तरी डेट करीत आहे. योग्य वेळ आल्यावर मी त्याबद्दल सांगेन. एका महिलेनं एखाद्या पुरुषाबरोबर फोटो काढल्यानं रोज तिचं नाव एखाद्या नवीन पुरुषाशी जोडणं योग्य नाही."मध्यंतरी कंगना एका परदेशी व्यक्तीबरोबर हातात हात धरून चालताना दिसली होती. तेव्हा तो तिचा बॉयफ्रेंड असल्याच्या चर्चाही सुरू होत्या. कंगना स्पष्टवक्ती आहे आणि प्रत्येक गोष्ट ती सोशल मीडियावर शेअर करते. अशात तिच्या लग्नाची बातमी ती चाहत्यांपासून का लपवून ठेवेल.

## शाहरुख खान करतो कोटींची कमाई

शाहरुख खानला बॉलीवूडमधील किंग खान या नावाने ओळखले जाते. शाहरुखचं वैयक्तिक आयुष्यही एका राजासारखंच आहे. शाहरुख आपल्या अभिनयाच्या जोरावर एका चित्रपटात कोटींची कमाई करतो. अभिनय क्षेत्रात तर किंग खानचा पाय रोवला गेला आहे पण शाहरुख क्रिकेटद्वारेसुद्धा बक्कळ कमाई करतो. २०२४च्या आयपीलच्या हंगामाला सुरूवात झाली असून कालच 'चेन्नई सुपर किंग्ज' विरुद्ध 'रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू' यांचा पहिला सामना पार पडला. 'चेन्नई सुपर किंग्ज'ने या सामन्यात बाजी मारली. तर आज 'कोलकाता नाइट रायडर्स' आणि 'सनरायझर्स हैदराबाद' यांचा सामना सुरू झाला आहे. शाहरुख खान 'कोलकाता नाइट रायडर्स' या टीमचा मालक आहे. आयपीलमधून दरवर्षी शाहरुखची किती कमाई होते याबद्दल जाणून घेऊयात.प्रत्येक आयपीएल संघाला टीव्ही ब्रॉडकास्ट आणि बीसीसीआयच्या प्रायोजकत्वातून मिळणाऱ्या कमाईचा काही हिस्सा मिळतो. शाहरुख खान आयपीएलमधील 'कोलकाता नाईट रायडर्स' संघाचा मालक आहे. या संघाद्वारे, शाहरुख खान ब्रँड एंडोर्समेंट्स, मॅच फी, फ्रँचायझी फी, BCCI इव्हेंट रेव्हेन्यू आणि बक्षीस रकमेतून भरपूर कमाई करतो. मात्र, यातून त्यांना किती कोटींची कमाई होते, याचा खुलासा झालेला नाही. मीडिया रिपोर्ट्सनुसार, शाहरुख खान आयपीएलमधील त्याच्या टीममधून दरवर्षी २५० ते २७० कोटी रुपयांची कमाई करतो. मात्र, या सामन्यांमध्ये अंदाजे १०० कोटींचा खर्चही होतो. हा सगळा खर्च खेळाडूंच्या खरेदी आणि व्यवस्थापनावर होतो.'कोलकाता नाईट रायडर्स'ची या संघाची कमाई १५० कोटींहून अधिक आहे. या संघात शाहरुख खानची हिस्सेदारी ५५ टक्के आहे, त्यामुळे अभिनेता दरवर्षी आयपीएलमधून ७० ते ८० कोटी कमावतोआयपीएल सुरू झाले तेव्हा शाहरुखने अभिनेत्री जुही चावला आणि तिचा पती जय मेहता यांच्या भागीदारीत संघ विकत घेतला.



## 'मिस युनिव्हर्स' मध्ये सहभागी होण्यास मनाई

उर्वशी रौतेलाने तिच्या करिअरची सुरूवात मॉडेलिंगपासून केली. २०१२ साली 'आय एम शी – मिस युनिव्हर्स इंडिया' सौंदर्यस्पर्धेत ती जिंकली होती. परंतु 'मिस युनिव्हर्स' २०१२ मध्ये तिला सहभागी होता आले नाही याची खंत तिला नेहमी वाटते. २०१२ सालची 'आय एम शी – मिस युनिव्हर्स इंडिया' स्पर्धा जिंकल्यानंतर उर्वशी रौतेलाचं पुढचं ध्येय 'मिस युनिव्हर्स' जिंकण्याचं होतं. परंतु, शेवटच्या क्षणी काही अडचणी आल्यामुळे तिला ते साध्य करता आलं नाही. तेव्हा भारताचे प्रतिनिधी निवडण्याची जबाबदारी सुष्मिता सेन यांच्या कंपनीकडे होती.'मिरची प्लस'ला दिलेल्या मुलाखतीत उर्वशीने याबाबत खुलासा केला. ती म्हणाली, "मी जेव्हा २०१२ मध्ये पहिल्यांदा 'मिस युनिव्हर्स इंडिया'चा किताब जिंकले. तेव्हा डोनाल्ड ट्रम्प आमचे बॉस होते 'मिस युनिव्हर्स'साठी वयाची मर्यादा आहे. 'मिस युनिव्हर्स'स मध्ये सहभाग घेण्यासाठी वय मर्यादा १८ होती. याबद्दल मला काहिचं माहित नव्हतं. मी तेव्हा १७ वर्षांची होती आणि लवकरच १८ वर्षांची होणार होती.

# राजस्थानने प्लेऑफमध्ये मारली धडक!

## दिल्लीने अष्टपैलू खेळी करत लखनऊवर केली मात

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**रसिख दर सलामच्या अखेरच्या षटकातील शानदार गोलंदाजीसह दिल्लीने लखनऊवर १९ धावांनी विजय मिळवला. फलंदाजी करताना अभिषेक पोरेल, ट्रिस्टन स्टब्सचे अर्धशतक आणि शाई होप, ऋषभ पंतच्या फटकेबाजीच्या जोरावर दिल्लीने २०८ धावा केल्या. या विजयासह दिल्लीने आपले प्लेऑफच्या शर्यतीत कायम आहे. पण दिल्लीच्या विजयासह राजस्थान रॉयल्सचा संघ आयपीएल २०२४ प्लेऑफमध्ये जाणारा अधिकृतपणे दुसरा संघ ठरला.**



### दिल्लीच्या सर्व आशा संपुष्टात आल्या

दिल्लीने दिलेल्या २०९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना लखनऊचा संघ १८९ धावाच करू शकला. आयपीएल २०२४ च्या प्राथमिक फेरीच्या अखेरच्या सामन्यात दिल्लीने घरच्या मैदानावर विजय मिळवला. यासह या हंगामातील संपूर्ण १४ सामने खेळणारा दिल्ली पहिला संघ ठरला, त्यांचे १४ सामन्यांत १४ गुण आहेत. त्यांनी अधिक २ गुण आपल्या खात्यात मिळवले आहेत. लखनऊ संघाने लवकर विकेट गमावले असले तरी संघाच्या इतर फलंदाजांनी कडवी झुंज दिली. निकोलस पुरन आणि अष्टपैलू खेळाडू अऱशद खानची वादळी खेळी पाहायला मिळाली.दिल्लीच्या या विजयामुळे लखनऊला प्लेऑफमध्ये पोहोचणे आता जवळपास अवघड झाले आहे. त्याचवेळी दिल्लीच्या सर्व आशा आता संपुष्टात आल्या आहेत.

दिल्लीने दिलेल्या २०९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना लखनऊचा संघ १८९ धावाच करू शकला. आयपीएल २०२४ च्या प्राथमिक फेरीच्या अखेरच्या सामन्यात दिल्लीने घरच्या मैदानावर विजय मिळवला. यासह या हंगामातील संपूर्ण १४ सामने खेळणारा दिल्ली पहिला संघ ठरला, त्यांचे १४ सामन्यांत १४ गुण आहेत. त्यांनी अधिक २ गुण आपल्या खात्यात मिळवले आहेत. लखनऊ संघाने लवकर विकेट गमावले असले तरी संघाच्या इतर फलंदाजांनी कडवी झुंज दिली. निकोलस पुरन आणि अष्टपैलू खेळाडू अऱशद खानची वादळी खेळी पाहायला मिळाली.दिल्लीच्या या विजयामुळे लखनऊला प्लेऑफमध्ये पोहोचणे आता जवळपास अवघड झाले आहे. त्याचवेळी दिल्लीच्या सर्व आशा आता संपुष्टात आल्या आहेत. या मोसमातील शेवटचा साखळी सामना खेळण्यासाठी दिल्ली कॅपिटल्स मैदानात उतरली होती. अशाप्रकारे, संघाला हंगामातील १४ सामन्यांत ७ विजय आणि ७ पराभवांसह केवळ १४ गुण मिळवता आले. दिल्ली अधिकृतपणे प्लेऑफमधून बाहेर नाही झाली, पण खराब रनरेटमुळे त्यांच्यासाठी प्लेऑफ गाठणे कठीण आहे. दिल्ली संघाच्या विजयासह राजस्थान रॉयल्स आता प्लेऑफमध्ये पोहोचला आहे.दिल्लीने दिलेल्या २०९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना लखनऊने ९ बाद १८९ धावा केल्या. लखनऊच्या डावाची सुरूवात फारच खराब झाली. केएल राहुल (५), मार्कस स्टॉयनिस (५), क्विंटन डिकॉक (१२), दिपक हुडा (०) हे लखनऊचे टॉप ४ फलंदाज स्वस्तात बाद झाले. त्यानंतर निकोलस पुरनने एकट्याने संघाचा डाव सावरला, त्याने २७ चेंडूत ४ षटकार आणि ६ चौकारांसह ६१ धावा करत बाद झाला. त्यानंतर आयुष बदोनी ६ धावा, कृणाल पंड्या १८ धावा करत बाद झाले. यानंतर लखनऊचा अष्टपैलू खेळाडू अरशद खानने ३३ चेंडूत ५ षटकार आणि ३ चौकार ५८ धावा करत शेवटपर्यंत लखनऊला सामन्यात टिकवून ठेवले. अरशद खानने त्याच्या कामगिरीने सर्वांनाच प्रभावित केले. त्याने जेक फ्रेझर मॅकगर्कलाहि पहिल्याच षटकात झेलबाद केले होते.दिल्लीकडून सामनावीर ठरलेल्या इशांत शर्माने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. तर खलील अहमद, अक्षर पटेल, मुकेश कुमार, कुलदीप यादव आणि ट्रिस्टन स्टब्स यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. तत्पूर्वी केएल राहुलने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यासह दिल्लीचा संघ प्रथम फलंदाजीसाठी उतरला आणि त्यांनी शानदार फटकेबाजी करत २०८ धावांचा डोंगर उभारला. संघाचा विस्फोटक सलामीवीर फलंदाज जेक फ्रेझर मॅकगर्क खातेही न उघडता लवकर बाद झाला असला तरी अभिषेक पोरेलने ३३ चेंडूत ४ षटकार आणि ५ चौकारांसह वादळी फलंदाजी करत ५८ धावा केल्या. त्यानंतर शाई होप (३८) आणि ऋषभ पंत (३३) यांनी विस्फोटक फलंदाजी केली. ट्रिस्टन स्टब्सने २५ चेंडूत ४ षटकार आणि ३ चौकारांसह ५७ धावा करत नाबाद राहिला. तर अक्षर पटेलने १४ धावा केल्या. लखनऊकडून नवीन उल हकने २ विकेट्स घेतल्या तर अऱशद खान आणि रवी बिश्नोईने प्रत्येकी १ विकेट घेतली.

# RCB vs CSK सामन्यावर पावसाचे सावट

## पावसामुळे मॅच रद्द झाल्यास कोणता संघ बाहेर होणार?

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयपीएल २०२४ मधील ६८वा सामना आरसीबी विरूद्ध सीएसके यांच्यात खेळवला जाणार आहे. आयपीएलमधील प्राथमिक फेरीतील हा अखेरचा सामना असणार आहे, यानंतर प्लेऑफचे सामने सुरू होणार आहेत. प्लेऑफच्या दृष्टीने दोन्ही संघांसाठी महत्त्वाचा सामना असणार आहे. चेन्नई-बंगळुरूचा सामना आरसीबीच्या घरच्या मैदानावर म्हणजेच एम चिन्नास्वामी स्टेडियमवर हा सामना खेळवला जाणार आहे.**



### विल जॅक्स आणि टोपली मायदेशी परतले

निव्वळ रन रेट +०.५२८ आहे. जर रॉयल चॅलेंजर्स थोड्या फरकाने सामना जिंकला तर तेही त्यांच्यासाठी फायदेशीर ठरणार नाही. कारण नेट रन रेटच्या बाबतीत तो सनरायझर्स हैदराबाद आणि सुपर किंग्जच्या मागे टाकू शकणार आहे. आरसीबीला जर प्लेऑफमध्ये जायचे असेल तर त्यांना चेन्नईवर १८ धावांनी विजय मिळवावा लागेल किंवा १८.१ षटकांत सामना जिंकावा लागेल. आरसीबीने खराब सुरूवातीनंतर आयपीएलच्या अखेरच्या टप्प्यात चांगली कामगिरी करत सलग सहा सामने जिंकले आहेत. ज्यांचा फायदा संघाला प्लेऑफच्या शर्यतीत कायम राखण्यासाठी झाला आहे. पण संघाचे दोन मोठे खेळाडू टी-२० विश्वचषकासाठी इंग्लंडला परतले आहेत. विस्फोटक फलंदाज विल जॅक्स आणि गोलंदाज रीस टोपली आगामी वर्ल्डकपसाठी मायदेशी परतले आहेत.

पण या सामन्यादिवशी बंगळुरूमध्ये पाऊस पडणार असल्याची बातमी समोर आली आहे. पावसामुळे हा सामना रद्द झाल्यास कोणता संघ प्लेऑफसाठी पात्र होणार, जाणून घ्या.सध्या प्लेऑफची शर्यत फार अटीतटीची सुरू आहे. प्रत्येत सामना संघांसाठी महत्त्वाचा असणार आहे. गुजरात वि केकेआरचा सामना अहमदाबादमध्ये पावसामुळे रद्द झाल्याने शुबमन गिलचा गुजरात टायटन्सचा संघ प्लेऑफमधून बाहेर पडला. मुंबई इंडियन्स, पंजाब किंग्सनंतर गुजरातही प्लेऑफच्या शर्यतीत नसेल. त्यामुळे केकेआरचा संघ सोडता उर्वरित ६ संघांमध्ये ३ जागांसाठी लढत असणार आहे. ज्यामध्ये सीएसके आणि आरसीबीदेखील प्रबळ दावेदार आहेत. पण या सामन्यावरही पावसाचे सावट आहे.RCB VS CSK सामन्यात पावसामुळे सामन्यात व्यत्यय येण्याची शक्यता आहे. हवामान खात्यानुसार, १८ मे रोजी चिन्नास्वामी येथे ७२ टक्के पाऊस पडण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत पावसामुळे सामना रद्द झाल्यास दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण मिळेल, त्यामुळे आरसीबीचे १३ गुण होतील आणि सीएसकेचे १५ गुण होतील. तर आयपीएल २०२४ मधील ६४वा सामना, दिल्ली किंवा लखनऊ यापैकी कोणताही संघ जिंकेल, त्यांचे १४ गुण असतील. त्यामुळे आरसीबीचा संघ गुण कमी असल्याने आणि अखेरचा सामना असल्याने प्लेऑफमधून बाहेर पडू शकतो.सध्या, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा नेट रन रेट +०.३८७ आहे.